गोपनीय

एक राष्ट्र, एक कर,
एक बाजार.

महाराष्ट्र शासन
वस्तू व सेवाकर विभाग

दूरध्वनी क्रमांक:- ०२२-०२३७६०८९३
ई-मेल:- spcstdcest3@gmail.com
dcest3hq4@gmail.com

विशेष राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय,
३ रा मजला, नवीन इमारत, ई-विंग,
वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई ४०० ०१०.

क्र. राकअ-२०२६/रासहआ (मुख्या.)४/आस्था-३/स्थानांतरण/ ब- ८, मुंबई दिनांक : 12 JAN 2026

प्रति,
मा. सर्व अपर राज्यकर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- राज्यकर विभागाने बदली सन - २०२६ संदर्भात पदस्थापनेसाठी ठरविलेले निकष / मार्गदर्शक तत्वे.

मा. महोदय,

उपरोक्त विषयानुसार, राज्यकर विभागातील अधिकारी यांच्या बदली सन - २०२६ संदर्भात पदस्थापनेकरीता ठरविलेले निकष / मार्गदर्शक तत्वे राज्यकर विभागाच्या वेबसाईट वर प्रसारीत करण्यात येत आहेत. तरी सदर निकषांबाबत आपल्या कार्यालयातील अधिनस्त असलेल्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून सदरबाबत उचित सुचना असल्यास एकत्रीतपणे योग्य मार्गाने या कार्यालयास १५ दिवसांच्या आत पाठविण्यात याव्यात.

**(मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने.)**

सोबत - वरीलप्रमाणे.

Nikam

(संजय निकम)
**राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) ४,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

## राज्यकर विभागाने बदली सन — २०२६ संदर्भात अन्वेषण शाखेतील पदस्थापनेसाठी ठरविलेले निकष / मार्गदर्शक तत्वे (राज्यकर उपआयुक्त, राज्यकर सहायक आयुक्त संवर्ग) चा प्रारुप मसुदा

### A] अन्वेषण शाखेतील पदस्थापनेचे निकष -:

*अ] अन्वेषण शाखेत पदस्थापनेसाठी पात्रता निकष (Qualifying Criteria) :-*

I. अन्वेषण शाखेत पदस्थापना देण्यासाठी संबंधित अधिकारी सर्वसाधारण/प्रशासकीय बदलीस पात्र असावा.

II. संबंधित अधिकाऱ्याचे वय ५४ पेक्षा जास्त असू नये.

III. संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी / लाचलुचपत प्रतिबंध विभागाची चौकशी सुरु नसावी. तसेच सचोटी बाबत प्रतिकुल शेरे नसावेत.

IV. संबंधित अधिकाऱ्याने सध्या कार्यरत असलेल्या संवर्गात यापुर्वी एकदाही अन्वेषण शाखेत काम केलेले नसावे किंवा एकूण दीड वर्ष अथवा दीड वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता अन्वेषण शाखेतील पदाचा अतिरिक्त कार्यभार हाताळलेला नसावा.

V. सद्यस्थितीत लेखा परीक्षण शाखा (Audit Branch) व अपिले कार्यशाखेत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांचा अन्वेषण शाखेतील पदस्थापनेसाठी विचार करता येणार नाही.

VI. सदर पात्र अधिकारी हा अन्वेषण शाखेत काम करण्यास अनिच्छुक नसावा.

**VII. अन्वेषण शाखेत पदस्थापना करताना खालील दोन निकष विचारात घेण्यात येतील —**

१. अधिकाऱ्यांच्या लगतच्या ५ वर्षांच्या गोपनीय अहवालाच्या प्रत्यक्ष गुणांची बेरीज ५० पैकी ४० किंवा त्याहून अधिक असावी. तथापि यापैकी एका वर्षाचा गोपनीय अहवाल उपलब्ध नसल्यास अथवा ६ महिन्यापेक्षा कमी कालावधीचा उपलब्ध असल्यास सदर बाबत एक वर्ष आधीचा गोपनीय अहवाल विचारात घेण्यात येईल.

२. a) **कार्यकारी पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मुल्यमापनाबाबतचे निकष —**

केंद्र शासनाने राज्य शासनाकरीता कामगिरीचे मुल्यांकन करताना जे निकष वापरलेले आहेत, त्याच धर्तीवर नोडल कार्यशाखेत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येईल.

**b)** अकार्यकारी पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मुल्यमापनाबाबतचे निकष —

१. पुढील शाखांमध्ये कार्यरत असलेले अधिकारी हे अकार्यकारी पदावर कार्यरत आहेत असे समजले जाईल - आयुक्त कार्यालय प्रशासन / मुख्यालय, प्रशिक्षण, आर्थिक बुद्धी संपदा कक्ष, आस्थापना, महाविकास, जनसंपर्क, दक्षता, विधी /

न्यायालयीन प्रकरणे, अंतर्गत पुनरावलोकन कक्ष, मुंबई विक्रीकर कायदा शाखा (मुंबई), स्वीय. सहायक इ.

२. सदरील अधिकाऱ्यांचे कामगिरीचे मुल्यांकन PRAISE SYSTEM व्दारे होत नाही.

३. सदर अधिकाऱ्यांचे मुल्यांकन त्यांच्या गत ५ वर्षांच्या गोपनीय अहवालाव्दारे करण्यात येईल.

***ब] अन्वेषण शाखेत पदस्थापनेकरीता निवड करण्यासाठीचे निकष (Selection Criteria) :-***

अन्वेषण शाखेत त्या त्या वर्षी जितकी पदस्थापना आवश्यक आहे त्यानुसार आढावा घेतला जाईल व पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यामधुन निवड करताना खालील मुद्यांच्या आधारे पदस्थापना देण्यात येईल-

जे अधिकारी वरील पात्रता निकषांनुसार पात्र ठरतात त्यांची सेवाज्येष्ठतेप्रमाणे यादी करुन अन्वेषण शाखेतील पदांच्या उपलब्धतेनुसार आवश्यक असलेल्या सेवाज्येष्ठ अधिकाऱ्यांना अन्वेषण शाखेत पदस्थापना देण्यासाठी विचार करण्यात येईल.

Shikam

## राज्यकर विभागाने बदली सन — २०२६ संदर्भात लेखा परीक्षण शाखेतील पदस्थापनेसाठी ठरविलेले निकष / मार्गदर्शक तत्वे (राज्यकर उपआयुक्त, राज्यकर सहायक आयुक्त संवर्ग) चा प्रारुप मसुदा

B] लेखा परीक्षण शाखेतील पदस्थापनेचे निकष -:

*अ] लेखा परीक्षण शाखेत पदस्थापनेसाठी पात्रता निकष (Qualifying Criteria) :-*

I. लेखा परीक्षण शाखेत पदस्थापना देण्यासाठी संबंधित अधिकारी नियत / प्रशासकीय बदलीस पात्र असावा.

II. संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी/लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची चौकशी सुरु नसावी. तसेच सचोटी बाबत प्रतिकुल शेरे नसावेत.

III. सद्यस्थितीत अन्वेषण शाखेत व अपिले कार्यशाखेत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांचा लेखा परीक्षण शाखेतील पदस्थापनेसाठी विचार करता येणार नाही.

**IV. लेखा परीक्षण शाखेत पदस्थापना करताना खालील दोन निकष विचारात घेण्यात येतील —**

१. अधिकाऱ्यांच्या लगतच्या ५ वर्षांच्या गोपनीय अहवालाच्या प्रत्यक्ष गुणांची बेरीज ५० पैकी ४० किंवा त्याहून अधिक असावी. तथापि यापैकी एका वर्षाचा गोपनीय अहवाल उपलब्ध नसल्यास अथवा ६ महिन्यापेक्षा कमी कालावधीचा उपलब्ध असल्यास सदर बाबत एक वर्ष आधीचा गोपनीय अहवाल विचारात घेण्यात येईल.

२. a) **कार्यकारी पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मुल्यमापनाबाबतचे निकष**

केंद्र शासनाने कामगिरीचे मुल्यांकन करताना राज्य शासनाकरीता जे निकष वापरलेले आहेत, त्याच धर्तीवर नोडल कार्यशाखेत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येईल.

b) **अकार्यकारी पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मुल्यमापनाबाबतचे निकष —**

१. पुढील शाखांमध्ये कार्यरत असलेले अधिकारी हे अकार्यकारी पदावर कार्यरत आहेत असे समजले जाईल - आयुक्त कार्यालय प्रशासन / मुख्यालय, प्रशिक्षण, आर्थिक बुद्धी संपदा कक्ष, आस्थापना, महाविकास, जनसंपर्क, दक्षता, विधी / न्यायालयीन प्रकरणे, अंतर्गत पुनरावलोकन कक्ष, मुंबई विक्रीकर कायदा शाखा (मुंबई), स्वीय. सहायक इ.

२. सदरील अधिकाऱ्यांचे कामगिरीचे मुल्यांकन PRAISE SYSTEM व्दारे होत नाही.

३. सदर अधिकाऱ्यांचे मुल्यांकन त्यांच्या गत ५ वर्षांच्या गोपनीय अहवालाव्दारे करण्यात येईल.

V. अधिकाऱ्याने विनंतीद्वारे मागितलेल्या ठिकाणी लेखा परीक्षण पद उपलब्ध नसेल तर त्यांचा लेखा परीक्षण पदावरील पदस्थापनेसाठी विचार केला जाणार नाही. मात्र विनंती प्रमाणे ठिकाण उपलब्ध असल्यास विचार केला जाईल.

*ब] लेखा परीक्षण शाखेत पदस्थापनेकरीता निवड करण्यासाठीचे निकष (Selection Criteria) :-*

लेखा परीक्षण शाखेत त्या त्या वर्षी जितकी पदस्थापना आवश्यक आहे त्यानुसार आढावा घेतला जाईल व पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यामधुन निवड करताना खालील मुद्यांच्या आधारे पदस्थापना देण्यात येईल-

जे अधिकारी वरील पात्रता निकषांनुसार पात्र ठरतात त्यांची सेवाज्येष्ठतेप्रमाणे यादी करुन लेखा परीक्षण शाखेतील पदांच्या उपलब्धतेनुसार आवश्यक असलेल्या सेवाज्येष्ठ अधिकाऱ्यांना लेखा परीक्षण शाखेत पदस्थापना देण्यासाठी विचार करण्यात येईल.

Gaikam

## राज्यकर विभागाने बदली सन — २०२६ संदर्भात अपिले शाखेतील पदस्थापनेसाठी ठरविलेले निकष / मार्गदर्शक तत्वे (राज्यकर उपआयुक्त संवर्ग) चा प्रारुप मसुदा

### C] अपिले शाखेतील पदस्थापनेचे निकष -:

*अ] अपिले शाखेत पदस्थापनेसाठी पात्रता निकष (Qualifying Criteria) :-*

I. अपिले शाखेत पदस्थापना देण्यासाठी संबंधित अधिकारी नियत / प्रशासकीय बदलीस पात्र असावा.

II. संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी/लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची चौकशी सुरु नसावी. तसेच सचोटी बाबत प्रतिकुल शेरे नसावेत.

III. सद्यस्थितीत अन्वेषण शाखेत व लेखा परीक्षण कार्यशाखेत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांचा अपिले शाखेतील पदस्थापनेसाठी विचार करता येणार नाही.

**IV. अपिले शाखेत पदस्थापना करताना खालील दोन निकष विचारात घेण्यात येतील —**

१. अधिकाऱ्यांच्या लगतच्या ५ वर्षांच्या गोपनीय अहवालाच्या प्रत्यक्ष गुणांची बेरीज ५० पैकी ४० किंवा त्याहून अधिक असावी. तथापि यापैकी एका वर्षाचा गोपनीय अहवाल उपलब्ध नसल्यास अथवा ६ महिन्यापेक्षा कमी कालावधीचा उपलब्ध असल्यास सदर बाबत एक वर्ष आधीचा गोपनीय अहवाल विचारात घेण्यात येईल.

२. a) **कार्यकारी पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मुल्यमापनाबाबतचे निकष**

केंद्र शासनाने कामगिरीचे मुल्यांकन करताना राज्य शासनाकरीता जे निकष वापरलेले आहेत, त्याच धर्तीवर नोडल कार्यशाखेत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येईल.

b) **अकार्यकारी पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मुल्यमापनाबाबतचे निकष —**

१. पुढील शाखांमध्ये कार्यरत असलेले अधिकारी हे अकार्यकारी पदावर कार्यरत आहेत असे समजले जाईल - आयुक्त कार्यालय प्रशासन / मुख्यालय, प्रशिक्षण, आर्थिक बुद्धी संपदा कक्ष, आस्थापना, महाविकास, जनसंपर्क, दक्षता, विधी / न्यायालयीन प्रकरणे, अंतर्गत पुनरावलोकन कक्ष, मुंबई विक्रीकर कायदा शाखा (मुंबई), स्वीय. सहायक इ.

२. सदरील अधिकाऱ्यांचे कामगिरीचे मुल्यांकन PRAISE SYSTEM व्दारे होत नाही.

३. सदर अधिकाऱ्यांचे मुल्यांकन त्यांच्या गत ५ वर्षांच्या गोपनीय अहवालाव्दारे करण्यात येईल.

V. अधिकाऱ्याने विनंतीद्वारे मागितलेल्या ठिकाणी अपिले पद उपलब्ध नसेल तर त्यांचा अपिले पदावरील पदस्थापनेसाठी विचार केला जाणार नाही. मात्र विनंती प्रमाणे ठिकाण उपलब्ध असल्यास विचार केला जाईल.

***ब] अपिले शाखेत पदस्थापनेकरीता निवड करण्यासाठीचे निकष (Selection Criteria) :-***

अपिले शाखेत त्या त्या वर्षी जितकी पदस्थापना आवश्यक आहे त्यानुसार आढावा घेतला जाईल व पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यामधुन निवड करताना खालील मुद्यांच्या आधारे पदस्थापना देण्यात येईल-

जे अधिकारी वरील पात्रता निकषांनुसार पात्र ठरतात त्यांची सेवाज्येष्ठतेप्रमाणे यादी करुन अपिले शाखेतील पदांच्या उपलब्धतेनुसार आवश्यक असलेल्या सेवाज्येष्ठ अधिकाऱ्यांना अपिले शाखेत पदस्थापना देण्यासाठी विचार करण्यात येईल.

Shikam

## राज्यकर विभागाने बदली सन — २०२६ संदर्भात नोडल व उर्वरित शाखेतील पदस्थापनेसाठी ठरविलेले निकष / मार्गदर्शक तत्वे (राज्यकर उपआयुक्त, राज्यकर सहायक आयुक्त संवर्ग) चा प्रारुप मसुदा

D] नोडल व उर्वरित शाखेतील पदस्थापनेचे निकष -:

उर्वरित कार्यशाखांमध्ये पदस्थापना करताना मुंबई-माझगांव (एमटीएनएल सहीत) येथे सलग १५ वर्षे व मुंबई- माझगांव (एमटीएनएल सहीत) कार्यालयाव्यतिरीक्त इतर ठिकाणी सलग ६ वर्षे पुर्ण करीत असलेल्या अधिकारी यांनी दिलेले ठिकाणाचे पसंतीक्रम, पदांची उपलब्धता, अधिकाऱ्यांच्या पुर्वीच्या पदस्थापनेचा तपशील व त्याचप्रमाणे स्थानांकरीता विनंती असल्यास प्राधान्यक्रमानुसार विचार करण्यात येईल.

➢ **तसेच सर्व कार्यशाखांमध्ये पदस्थापना करताना प्रशासनाची निकड, कर्मचाऱ्याचे वय, गुणवत्ता, रिक्त पदे आणि कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या आवेदनाच्या अनुषंगाने प्राधान्यक्रम यांचा विचार केला जाईल. राज्यकर विभागाने पुढीलप्रमाणे प्राधान्यक्रम ठरविले आहेत —**

I. स्वत: दिव्यांग अधिकारी.
II. अधिकाऱ्याचे यथास्थिती पती/पत्नी/पाल्य मतिमंद वा दिव्यांग.
III. अधिकाऱ्याचे स्वत:चे गंभीर आजारपण, [कर्करोग/पक्षाघात/मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रीया किंवा डायलेसिस सुरु असलेले/, ब्रेन ट्युमर किंवा मेंदुवरील शस्त्रक्रीया/निश्चेतनावस्था/मनोविकृतीने ग्रस्त/ हृदयरोगाने आजारी (हृदय शस्त्रक्रीया)].
IV. विधवा व परितक्त्या.
V. पती-पत्नी एकत्रिकरण,
VI. अधिकाऱ्याचे यथास्थिती पती/पत्नीचे, पाल्याचे अथवा अवलंबूनअसलेले आई-वडील किंवा महिला अधिकारी यांचे सासू किंवा सासरे यांचे गंभीर आजारपण, [कर्करोग/पक्षाघात/मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रीया किंवा डायलेसिस सुरु असलेले/, ब्रेन ट्युमर किंवा मेंदुवरील शस्त्रक्रीया/निश्चेतनावस्था/मनोविकृतीने ग्रस्त/ हृदयरोगाने आजारी (हृदय शस्त्रक्रीया)].
VII. मुलांचे १० वी / १२ वी चे वर्ष
VIII. इतर (उपरोक्त I ते VIII मध्ये अंतर्भूत न होणारे अधिकारी)

**उपरोक्त नमूद प्राधान्यक्रमानुसार पदस्थापना देताना सेवाज्येष्ठतेप्रमाणे पदस्थापना देण्यात येईल. त्याचप्रमाणे सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन अधिकाऱ्यांची पदस्थापना बदलण्याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.**

Ghikam